# हिरेतुल्य शिवजयंती

भारतीय संस्कृतीच्या गाभाऱ्यातील आध्यात्मिक ज्ञान आजही विश्वाला प्रेमाचा,विश्व बंधुत्वाचा संदेश देत आहे. मंदिरातील घंटा वाजताच घंटेच्या नादलहरींमुळे पाषाणाच्या मूर्तीसुद्धा जाग्या व्हाव्यात अशी आपली संस्कृती आहे. आजही सारे जग भारतीय संस्कृतीकडे आकर्षिले जाते. कारण? कारण भारत ही परमात्म्याची दिव्य अवतरण भूमी आहे. या भारतभूमीवर अनेक संत ऋषीमुनी, धर्मपिता होऊन गेले. त्या सर्वांनी आपापल्या परीने दिव्य शिकवण दिली. तरी देखील धर्माची ग्लानी होतच गेली. आज तर, तिने चरणसीमा गाठली आहे. गीतेत सांगितल्याप्रमाणे अधर्माचा विनाश करुन सदधर्माची स्थापना करण्यासाठी परमात्म्याचे भारतभूमीवर दिव्य अवतरण होते. त्याचे यादगार म्हणून माघ महिन्यातील कृष्णपक्षातील चतुर्दशी महाशिवरात्री म्हणून मोठ्या उत्साहाने भारतभर साजरी केली जाते.

कन्याकुमारीपासून काश्मिरपर्यंत सर्वत्र शिव मंदिरे आहेत. परमात्मा शिवाला ओंकारेश्वर, रामेश्वर, गापेश्वर, केदारनाथ, पतितपावन, पापकटेश्वर, मुक्तेश्वर, सदाशिव, महाकालेश्वर, सोमनाथ, अमरनाथ, पशुपतीनाथ, पारसनाथ इत्यादी नावानी संबोधिले जाते. ही त्याची कर्तव्यवाचक नावे आहेत. खरे तर शिवपरमात्मा मुळात निराकार, अशरीरी असून, परमधामनिवासी आहे. त्याचा जन्म देवता वा मानव पुत्र रुपाने होत नाही. तो सदा कर्मातील व मुक्त आहे. दुः खहर्ता, सुखकर्ता आहे, मनुष्यात्म्यांना मुक्ती व जीवन मुक्तीचे वरदान देणारा आहे. पतितपावन, विश्वकल्याणकारी, स्वर्गाचा रचयिता आहे. सर्व शक्तीमान आहे.

कुलियुगाच्या अंतिम समयी शिवपरमात्मा ज्या साधारणः मानवी शरीरात प्रवेश करतो, त्याचे नाव प्रजापिता ब्रम्हा ठेवतो. व त्यांच्यामार्फत आध्यात्मिक ज्ञान व व सहज राजयोगा चे शिक्षण देऊन मानवाला देवता बनविण्याचे महान कार्य करतो. १९३६ साली शिवपरमात्म्याचे प्रजापिता ब्रम्हा यांच्या शरीरात दिव्य अवतरण आले असून, त्यास २००८ मध्ये ७२ वर्षे झाली आहेत. शिव परमात्म्याने स्थापन केलेले प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय ७२ वर्षापासून देशोदेशी काढलेल्या ८५०० हून अधिक शाखा- उपशाखांद्वारे साऱ्या जगाला ईश्वरीय ज्ञानाने उजळून टाकण्याचे कार्य करीत आहेत. शिव पुराणात म्हटले आहे की, मानव मात्राला अनुग्रह देण्यासाठी शिव, ब्रम्हाच्या लालटी प्रकटले व त्याला आपले साकार माध्यम बनवून त्याच्यामार्फत सत्ययुगी सृष्टीची स्थापना केली. भाग्यशाली रथ म्हणून प्रजापिता ब्रम्हाला मंदिरातून शिवाचे वाहन नंदी दाखविण्यात येते व त्याचीही पूजा केली जाते.

शिवलिंगावर त्रिपुंड का लावतात? शिवलिंगावर त्रिपुंड रेखांकिंत करुन त्यावर तीन पानांचा बेल वाहतात. शिवपरमात्मा हा ब्रम्हा, विष्णू व शंकर यांचा निर्माता असल्याने त्याला त्रिमूर्ती शिव असेही म्हणतात. तो कलियुगी पतित, भ्रष्ट दुनियेचा विनाश व विष्णूद्वारे दैवी सृष्टीची पालना करतो. शिव परमात्म्याच्या या तीन कर्तव्यांचे प्रतीक म्हणून त्याला त्रिपुंड लावून तीन पानांचा बेल वाहतात.

शिवलिंगावर त्रिपुंड का लावतात? शिवलिंगावर त्रिपुंड रेखांकित करुन त्यावर तीन पानांचा बेल लावतात. शिवमात्मा हा ब्रम्हा, विष्णु व शंकर यांचा निर्माता असल्याने त्याला त्रिमुर्ती शिव असेही म्हणतात. तो ब्रम्हाद्वारे सत्ययुगी दुनियेची स्थापना शंकराद्वारे कलियुगी पतित, भ्रष्ट दुनियेचा विनाश व विष्णुद्वारे दैवी सृष्टीची पालना करतो. शिव परमात्म्याच्या या तीन कर्तव्यांचे प्रतिक म्हणून त्याला त्रिंपुड लावून तीन पानांचा बैल वाहतात.

**शिव आणि शंकर यामधील फरक -** बहुतेक लोक शिव आणि शंकर एकच मानतात. हे दोन्ही वेगवेगळे आहेत, हे वरील विवेचनावरुन स्पष्ट होते. शंकर आकारी देवता आहे. शिवाय ते सदैव ध्यानस्थ बसलेले दाखवितात. म्हणून शिव परमात्म्या आरती करताना ब्रम्हा, विष्णु, शंकर तुमको ध्यावे म्हटले जाते.

**सर्व आत्म्यांचे पिता शिव परमात्मा -** हिंदू, मुस्लिम, शीख, ईसाई आपसमे हे भाई-भाई अशी घोषणा केली जाते. परंतु या सर्वांचा पिता कोण हे मात्र कोणी जाणत नाही. हिंदू लोक शिवाला परमात्मा म्हणतात. अमरनाथ, पशुपतीनाथ आदी बारा ज्योतिर्लिंगे शिव परमात्म्याच्याच प्रतिमा आहेत. गोपेश्वर येथील मंदिरावरुनही स्पष्ट होते की, शिव हा श्रीकृष्ण व श्रीराम या देवतांनाही पूज्य होता. मुस्लिमांच्या मक्का येथील तीर्थस्थानीही शिवलिंगाच्या आकाराचा एक पवित्र पाषाण आहे. त्याला ते 'संग-ए- असवद म्हणतात.' महंमद पैगंबराने त्याची स्थापना केली असे मुस्लिम बांधव मानतात. येशुख्रिस्त व गुरुनानक परमेश्वराला ज्योतिस्वरुप मानतात. यहुदी लोक परमात्म्याला 'जेहोवा' या नावाने संबोधितात. जपानमधील बौद्ध धर्माचे कित्येक लोक शिवलिंगाच्या आकाराची प्रतिमा समोर ठेऊन त्रीवार मन एकाग्र करतात.

बॅबिलोन येथे 'शिऊन', मिस्त्रमध्ये, आईसिस, टोममध्ये, प्रियपस, चीनमध्ये हुवेड ही फुट, युनानमध्ये फल्लूस, या नावाने

शिवाला संबोधितात. इंडोनेशिया सुमात्रा, इस्त्राईल, स्कॉटलंड येथील लोकही शिवलिगांच्या आकाराच्या प्रतिमेलाच परमेश्वर मानतात. तात्पर्य आत्मिकदृष्ट्या सर्व जाती धर्मांचे लोक शिवाची मुले आहेत. म्हणून आपसात भाऊ-भाऊ आहेत व सर्व आत्म्यांचा पिता परमात्मा आहे, हे जाणल्यानेच विश्वात एकता व बंधुभाव निर्माण होऊ शकेल.

**हिरेतुल्य शिवजयंती -** शिव परमात्म्याचे भारत भूमीवर दिव्य अवतरण आले असून, तो साऱ्या जगाला ज्ञानप्रकाश देत आहे. पुढील काही वर्षांतच या ईश्वरीय ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र पसरुन त्यानंतर कलियुगी, तमोप्रधान दुनियेचा विनाश होऊन सत्ययुगी, दैवी सृष्टीची स्थापना होणार आहे. ईश्वरीय ज्ञानाची धारणा केल्याने व सहज राजयोग च्या अभ्यासाने नर-नारींना देवी देवता पद प्राप्त होते. म्हणून शिवजयंती ही हिरेतुल्य जयंती आहे.

**प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय -** शिवपरत्म्याने १९३६ साली प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाची स्थापना केली. हे विश्व विद्यालय ईश्वरीय ज्ञान प्रकाशाने विश्व परिवर्तनाचे महान कार्य गेली ७२ वर्षे जोमाने करीत आहे. ईश्वरीय ज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण घेऊन पवित्र जीवन जगणाऱ्यांना ब्रम्हाकुमार-ब्रम्हाकुमारी म्हणून संबोधिले जाते. या विश्व विद्यालयाच्या १०० हून अधिक राष्ट्रांतून ८५०० हून अधिक शाखा, उपशाखा असून, त्याचे आंतरराष्ट्रीय कार्यालय राजस्थानातील माऊंट आबू येथे आहे. हे विश्व विद्यालयाला यूनो नेही मान्यता दिली आहे. सर्व धर्म जाती, भाषा, संस्कृतींच्या लोकांना ईश्वरीय ज्ञान विनामुल्य दिली जाते. अधिक माहितीसाठी जवळच्या विश्व विद्यालयाच्या शाखेला भेट द्या.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com